नि. फौ. ख. क्र.१३०/२०१८ निशाणी क्र.२९

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – सुखराम श्रीराम तेलगोटे

वय – ७३ वर्षे, व्यवसाय – काही नाही.

पत्ता – रा. नयानगर, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री के. एस. ताकवाले यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. मी सर्व आरोपींना ओळखतो. दि.०१.०७.२०१८ रोजी सकाळी १०.३० ते ११.०० चे दरम्यान मी आरोपी क्र.१ दिलीप हिवराळे याच्या घराच्या बाजूला असलेल्या माझ्या मालकीच्या प्लॉटमध्ये मी गेलो होतो. मी तेथे गेलो असता आरोपी क्र.१ दिलीप हिवराळे तेथे आला व तो मला असे म्हणाला की, तु इथे कशाला आला. त्यावेळी मी त्याला असे म्हणालो की, माझ्या प्लॉटमध्ये विटा आणि दगड पडलेले आहेत, ते मी पाहण्याकरीता येथे आलो आहे. आमची बोलचाल चर्चा सुरु असताना आरोपी क्र.२ दिलीप हिवराळे हा तेथे एक लाकडी दांडा घेवून आला आणि त्याच्या पाठोपाठच इतर आरोपी विलास, कैलास आणि गुलाब हे सुध्दा तेथे आले होते. सर्व आरोपींनी मिळून मला मादरचोदा, फोकनीच्या, तुझ्या मायची गांड झवं इत्यादी शिवीगाळ केली. शिवीगाळ चालू असतानाच आरोपी अमोल हिवराळे याने माझ्या डाव्या पायाच्या पुरणीवर लाकडी दांड्याचा प्रहार केला तसेच त्याच दांड्याने दुसरा प्रहार माझ्या डोक्यावर केला. त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्त निघाले.

२. त्यानंतर दिलीप हिवराळे याने माझ्या उजव्या कानावर चाकूने वार केल्यामुळे माझा उजवा कान फाटला. दिलीप आणि अमोल यांनी मला लोटलाट केल्यामुळे खाली पडलो, त्यामुळे माझ्या उजव्या हाताला मार लागला. माझ्या बाजूला सर्व आरोपी जमा झाले व मारा साल्याला अशी चिथावणी विलास, कैलास, गुलाब यांनी दिली आणि शिवीगाळ केली.

३. त्यानंतर तेथे माझा मुलगा नागेश आणि भाऊ कृष्णा हे त्या ठिकाणी आले होते. त्यानंतर त्यांच्या सोबत पो.स्टे. बाळापूर येथे जावून सर्व आरोपींविरूध्द रिपोर्ट दाखल केला होता. आता मला दि.०१.०७.२०१८ रोजीचा रिपोर्ट दाखविण्यात आला, त्यावर

माझी सही असून त्यामध्ये लिहीलेला संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येत आहे.

४. त्यानंतर दि.०९.०७.२०१८ रोजी पोलीस माझ्या घरी आले होते. त्यावेळी पोलीसांनी माझे शर्ट, पायजामा आणि बनियान इ. कपडे जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे. पोलीसांनी जप्त केलेले कपडे, चाकू आणि लाकडी दांडा मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला एका खाकी कागदामध्ये बांधलेले कपडे व चाकू दाखविण्यात आला, त्यामध्ये असलेले पिवळसर रेषा असलेले शर्ट, पांढऱ्या रंगाचा पायजामा आणि एक पांढऱ्या रंगाचे बनियन हे कपडे माझेच असून पोलीसांनी माझ्याकडून जप्त केले होते. त्यातील शर्टला **आर्टीकल अ,** पायजामाला **आर्टीकल ब** आणि बनियनला **आर्टीकल क** देण्यात येत आहे. आता मला एक चाकू दाखविण्यात आला. तो चाकू तोच आहे, ज्या चाकूने दिलीप हिवराळे यांनी माझ्यावर वार केला होता. त्यास **आर्टीकल ड** देण्यात येत आहे. आता मला एक लाकडी दांडा दाखविण्यात आला. तो लाकडी दांडा तोच आहे, ज्या लाकडी दांड्याने अमोल हिवराळे यांनी मला मारहाण केली होती. त्यास **आर्टीकल इ** देण्यात येत आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. ते सर्वजण आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. वानखडे यांचे मार्फत</u>

५. माझे शिक्षण इयत्ता ११वी पर्यंत झालेले आहे. तहसिल कार्यालयात दस्तलेखक म्हणून मी काम करीत होतो. ज्या जागेवर मी गेलो होतो, ती जागा माझ्या मालकीची असल्याबाबत माझ्या नावे खरेदीखताचा दस्त नाही. मी स्वतःहुन सांगतो की, सदर जागा सन १९८५ पासून माझ्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, जी जागा माझ्या मालकीची आहे असे मी सांगत आहे, ती जागा मला कोणत्याही व्यक्तीने विकलेली नाही. घटना घडल्यानंतर २–३ तासांनी मी पो.स्टे.ला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी तहसिल कार्यालयात दस्तलेखक म्हणून काम केलेले असल्यामुळे अनेक पोलीसांशी माझ्या ओळखी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जी जागा माझ्या मालकीची आहे, असे मी

सांगत आहे, त्या जागेमधून एक रस्ता तयार करण्यात आलेला असून तो रस्ता सिमेंटचा असून त्या रस्त्याची रुंदी अंदाजे ७–८ फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जो प्लॉट माझ्या मालकीचा आहे असे सांगत आहे त्या प्लॉटच्या मधोमध सदर रस्ता निर्माण केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी प्लॉट अस्तित्वात नसल्यामुळे तेथून सरकारी रस्ता तयार करण्यात आलेला आहे.

६. सदर प्लॉट संदर्भात घटनेपुर्वी अंदाजे ५–६ वर्षांपासून आरोपी आणि माझे वाद सुरु होते. सदर प्लॉट संदर्भात कोणत्याही न्यायालयात अथवा कार्यालयात केस दाखल केलेली नाही. सदर प्लॉट हा आरोपींच्या घराला लागून असल्यामुळे त्यावर हिवराळे कुटुंबिय अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे त्याबाबत वाद सुरु होते. सदर प्लॉट बाबत पो.स्टे. बाळापूर येथे सुरुवातीला तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीसांनी आरोपीविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील आरोपींनी सुध्दा माझ्या विरुध्द पो.स्टे., बाळापूर येथे तक्रारी दाखल केल्या होत्या.

७. मला दारु पिण्याचे व्यसन नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी दारु पिलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी दारु पिलेल्या अवस्थेत आरोपी क्र.१ च्या घरी जावून शिवीगाळ केली होती.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही आरोपी क्र.१ च्या घरी जावून शिवीगाळ केली त्यावेळी केवळ आरोपी क्र.१ ची पत्नी एकटीच घरी होती ? |
| **उत्तरः** | हे खोटे आहे. |

८. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या घरी जावून शिवीगाळ करतेवेळी मी आरोपी क्र.१ च्या पत्नीला दिलीप कोठे आहे असे विचारणा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिलीप घरी नाही, असे त्याचे पत्नीने सांगितले त्यावेळी मी तिचा पदर ओढला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ च्या पत्नीला मी चापटांनी मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ च्या पत्नीने आरडाओरडा केल्यामुळे मी पळून जात असताना तेथे असलेल्या नालीला माझा पाय अडकून पडल्यामुळे माझ्या पायाला जखम झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉटवरील घटनास्थळाजवळ एक नाली असून ती

जास्तीत जास्त एक फुट खोल आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे घर आणि घटनास्थळ प्लॉट हे एका लाईनमध्ये आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही आरोपी क्र.१ च्या पत्नीचा पदर ओढून लोटलाट केल्यामुळे तीने तुमच्या विरुध्द बाळापूर पो.स्टे., मध्ये रिपोर्ट दिला होता का ? |
| **उत्तरः** | जी घटना घडलीच नाही, त्या विषयी कोणताही रिपोर्ट दिला असल्याची मला कोणतीही माहिती नाही. |

९. हे म्हणणे खरे आहे की, माया हिवराळे हिने माझ्या विरुध्द बाळापूर न्यायालयात केस दाखल केलेली असून त्याचा क्रमांक नि.फौ.ख.क्र.८८/२०१८ असा आहे. विलास हिवराळे हे पारसला नोकरीला आहेत किंवा नाहीत हे मला माहित नाही. विलास हिवराळे हे निश्चित कोठे राहतात, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिलीप आणि अमोल यांनी मला लोटलाट केल्यामुळे मला लागले होते. मी स्वतःहुन सांगतो की, त्यांनी मला मारहाण केली होती.

१०. दिलीप आणि अमोल यांनी मला लोटलाट केल्यामुळे मी खाली पडलो आणि मी खाली पडल्यामुळे माझ्या उजव्या हाताला मार लागला हे विधान मी पोलीसांना रिपोर्ट आणि बयान देतेवेळी कथन केले आहे. (पडलो आणि पाडले असे वेगवेगळे शब्द नमुद केलेले आहेत.) हे म्हणणे खरे नाही की, घटना घडल्यानंतर मी माझ्या घरी गेल्यानंतर घरच्या व्यक्तीशी संगनमत करुन सदर घटनेचा रिपोर्ट दाखल केलेला आहे.

११. लाकडी दांडा आणि लाकडी काठी यातील फरक मला समजतो. हे म्हणणे खरे आहे की, फावडे, टिकास, कुऱ्हाड यांना लावलेल्या लाकडी वस्तूस दांडा असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, फावडे, टिकास, कुऱ्हाड यांना लावलेला लाकडी दांडा हा चोपडा असतो.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | आर्टीकल इ वर असलेली जी लाकडी वस्तू आहे याला दांडा म्हणता येणार नाही, हे म्हणणे बरोबर होईल का ? |
| **उत्तरः** | सदर लाकुड ही दांडा सदृश लाकडी वस्तू आहे. |

१२. लाकडी दांडा कोणत्या झाडाचा होता, हे मी पोलीसांना रिपोर्ट देतेवेळी आणि बयान नोंदवितेवेळी सांगितले नव्हते. रिपोर्ट देतेवेळी आणि बयाण नोंदवितेवेळी पोलीसांनी लाकडाची लांबी, रुंदी आणि गोलाई याविषयी कोणतेही स्पष्टीकरण सांगितले

नव्हते. आर्टीकल ड वर असलेल्या चाकूची लांबी रुंदी याविषयी कोणतेही स्पष्टीकरण मी पोलीसांना सांगितले नव्हते.

१३. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल इ वर असलेले लाकूड हे चोपडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल इ वर असलेले लाकूड मी आज रोजी पहिल्यांदाच न्यायालयात पाहत आहे. आर्टीकल ब वर असलेला पायजामा माझाच आहे हे ओळखण्यासाठी त्यावर कोणतीही विशिष्ट खुण नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल ब वर असलेला पायजामा माझा नाही. आर्टीकल अ वर असलेले शर्ट माझेच आहे, हे ओळखण्याकरीता त्यावर कोणतीही विशिष्ट खुण नाही. आर्टीकल क वर असलेल्या बनियान ची साईज किती आहे तसेच ती बनियान कोणत्या कंपनीची आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ, ब, क यावर दाखल असलेले कपडे हे माझे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ,ब,क वर दाखल असलेले कपडे पोलीसांनी माझ्याकडून जप्त केलेले नाहीत.

१४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझे प्लॉट संदर्भात अनेक वर्षांपासून वाद असल्यामुळे त्या प्लॉटवर आरोपींनी जावू नये म्हणून त्यांच्या विरुध्द खोटा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील प्लॉटच्या नालीमध्ये पडल्यामुळे माझा पाय मोडला होता आणि कानाला जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ च्या घरी गेल्यामुळे त्यांनी माझ्यावर केस दाखल करु नये म्हणून त्यांच्या विरुध्द खोटा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणातील आरोपी व्यक्ती घटनास्थळावर हजर नसताना त्यांच्या विरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे.

१५. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपींनी मिळून मला मादरचोदा, फोकनीच्या, तुझ्या मायची गांड झवं इत्यादी शिवीगाळ केली, हे मी खोटे सांगितले आहे. पोलीसांनी ज्या वस्तू माझ्या ताब्यातून जप्त केल्या होत्या त्याचा जप्ती पंचनामा तयार केल्यानंतर त्या जप्ती पंचनाम्याची एक प्रत मला दिली नव्हती. जप्त केलेल्या वस्तूंची ओळख परेड करण्याकरीता मला पोलीसांनी पो.स्टे.ला बोलाविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटा रिपोर्ट दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द खोटे बयाण देवून आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– १८.०९.२०२४**

| | |
|---|---|
| **समक्ष** | **श्रवणोत्तर निवेदन स्विकृत** |
| | VISHNU DATTARAO GITE Digitally signed by VISHNU DATTARAO GITE Date: 2024.09.18 16:54:12 +0530 |
| **(विष्णु द. गिते)** | **(विष्णु द. गिते)** |
| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,** |
| **(न्यायालय क्र.२), बाळापूर.** | **(न्यायालय क्र.२), बाळापूर.** |

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Shri. Vishnu D. Gite**<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 18/09/2024 |
| Order signed by P.O on | :- | 18/09/2024 |
| Order uploaded on | :- | 18/09/2024 |